N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुंणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** शिरुर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0050 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**17/01/2026 04:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 16/01/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 16/01/2026
**Time From (वेळेपासून):** 14:06 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:06 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/01/2026 **Time (वेळ):** 04:06 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 007

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/01/2026 04:06 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** छत्रपती संभाजी चौक, न्हावरे -,न्हावरा , ता शिरुर, जि·पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अविनाश बाबासाहेब घरबुडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9860667770

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती.प्रमीला नागेश वानखेडे | | | 1. फलट नं 404,तक्षशिला सोसायटी ,ठुबे नगर,खराडी बायपास,पुणे,बिल्डींग ए,अशोका नगर,पठारे ,शिरूर,पुणे ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 14 नोटा | 7,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

शिरूर पो स्टे गु र नं 50/2026 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे
फिर्यादी-अविनाश बाबासाहेब घरबुडे, वय-40 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 9860667770
आरोपी- 1)श्रीमती.प्रमीला नागेश वानखेडे, वय –44 वर्षे, पद ग्राम महसुल अधिकारी,सजा –शिरसगाव काटा,ता. शिरुर,जि.पुणे रा.फलॅट नं 404,तक्षशिला सोसायटी बिल्डींग ए,अशोका नगर,पठारे ठुबे नगर,खराडी बायपास,पुणे
गु.घ.ता.वेळ व ठिकाण -दिनांक 16/01/2026 रोजी 14/06 वा च्या सु छत्रपती संभाजी चौक, न्हावरे - तळेगावरोड, न्हावरा , ता शिरुर, जि पुणे
हकीकत-मी अविनाश बाबासाहेब घरबुडे, वय-40 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 9860667770

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि.12/01/2026 रोजी 14.30 वा मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्रीमती. मनिषा झेंडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तक्रारदार श्री. लक्ष्मण मारुती शिंदे, वय - 56 वर्ष, मु पो शिरासगावकाटा, ता शिरुर, जि पुणे, मो नं – 8080686959, 8459760864 यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. तक्रारदार यांना आम्ही त्यांचे वर नमुद मोबाईलवर संपर्क करुन आम्ही उदया दिनांक 13/01/2026 रोजी 11.00 वा चे सुमारास न्हावरे येथे सुरक्षित ठिकाणी भेटुन पुढील कारवाई करु उदया तुम्ही तेथे या असे सांगितले. त्यानंतर श्रीमती. मनिषा झेंडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तात्काळ आम्हाला सदर कारवाई करीता वस्तु व सेवा कर विभागाचे पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. सदर विभागाशी आम्ही संपर्क करुन पंच म्हणुन 1) श्री. ऋषिकेश शांताराम खोपडे, वय 28 वर्षे, व्यवसाय-नोकरी, करसहाय्यक वस्तु व सेवाकर विभाग पुणे, रा. साई विला, फ्लॅट नं 17, फेज 1, जांभुळवाडी, पुणे- 411046 मो न 9823130109 पंच 2) कु कोमल सैदु जाधव, वय 34, व्यवसाय नोकरी, पद- करसहाय्यक,वस्तु व सेवाकर विभाग, पुणे रा. छाया निवास, सदाशिव पेठ, पंताचा गोट, पुणे 411030, मो न 9623207582 हे उपलब्ध झाले. ते ला प्र वि कार्यालयात बोलावुन घेतले ते 18.00 वा चे सुमारास ला प्र वि कार्यालयात आले. तसेच सदर कारवाई करीता आम्हास पोशि/95 रवि दिवेकर, पोशि/7364, भुषण ठाकुर, मपोहवा 2008/ सुप्रिया काळे,. आणि चालक पो शि 10674/ माळी असे पथक उपलब्ध करुन दिले. सर्वांना योग्य त्या सुचना दिल्या. पंच व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी दोन्ही पंचाना त्याची माहिति घेतली. त्यानंतर मी दोन्ही पंचांना एका तक्रारदाराने लोकसेवकाविरुध्द लाचेच्या मागणी संदर्भात तक्रार केली असल्याचे सांगितले व सदर तक्रारीची पडताळणी करावयाची असल्याचे सांगून पडताळणी पंचनाम्याचा उददेश व कारवाई पदधत समजावून सांगितली.व त्यांना पंच म्हणून काम करण्याची विनंती केली असता त्यांनी पंच म्हणून काम करण्याची स्वखुषीने संमती दर्शविली. पंच व सापळा पथकास दुसरे दिवशी दिनांक 13/01/2026 रोजी 08:00 वा. लाप्रवि कार्यालय, पुणे येथे हजर होण्याचे आदेशित केले.

दिनांक 13/11/2026 रोजी 09.00 चे दरम्यान आम्ही व सापळा पथक, ला प्र वि कार्यालय, पुणे येथे असताना तक्रारदार यांचा मला फोन आला व त्यांनी सां◌ंगितले की तलाठी मॅडम व माझे बोलणे झाले असुन तलाठी मॅडम या आज रोजी तलाठी कार्यालय शिरसगाव काटा येथे येणार नसुन त्यांनी मला दिनांक

16/01/2026 रोजी तलाठी कार्यालय शिरसगावकाटा येथे बोलावले आहे. सदरबाबतची सुचना पंच व सापळा पथकास दिली.

त्या प्रमाणे दिनांक 16/01/2026 रोजी 07.30 चे दरम्यान मी, पंच व सापळा पथक अंमलदार पोशि/95 रवि दिवेकर, पोशि/7364 भुषण ठाकुर, मपोहवा 2008/ सुप्रिया काळे आणि चालक पो शि 10674/ माळी शासकीय वाहन इरटिगा गाडी क्र. एमएच 12 युसी 4109 ने ला प्र वि कार्यालय, पुणे येथुन साधुवासवानी चौक-हडपसर मार्गे -पुणे - सोलापुर रोड - चौफुला येथुन डावीकडे वळुन केडगाव मार्गे नाव्हरा, पुणे येथे घोडगंगा साखर कारखाना, न्हावरे, ता शिरुर , जि पुणे येथे सुरक्षित ठीकाणी पोहचलो तेथे 10.10 वा. चे सुमारास सदर ठिकाणी दोन इसम त्यांचे वेगवेगळ्या दुचाकी वाहनावरुन आले. त्यावेळी आम्ही त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव लक्ष्मण मारुती शिंदे वय – 56 वर्षे, रा. मु.पो. शिरसगाव काटा, ता. शिरुर, जि. पुणे असे सांगुन त्यांचेसोबत आलेले दुसरा इसम हा त्यांचा मुलगा नामे सुत्रधार लक्ष्मण शिंदे असे सांगीतले. तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुशंगाने नमुद कारवाईकरीता पंच क्रं 1 म्हणुन श्री. रुषीकेश शांताराम खोपडे व पंच क्रं 2 म्हणुन श्री. श्रीमती. कोमल सैदु जाधव हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर पुढील कारवाई हि कोणासही संशय येऊ नये म्हणुन न्हावरे येथील घोडगंगा साखर कारखान्याच्या गेटसमोरील मोकळया जागेमधुनच करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर मी , पंचांची तक्रारदार व पथकासोबत एकमेकांची ओळख करुन दिली. त्यानंतर मी तक्रारदार यांना त्यांची तक्रार कथन करण्यास सांगीतले असता तक्रार श्री मारुती शिंदे यांनी कथन केली ती खालीलप्रमाणे "वरिल विषयानुसार मी मौजे शिरसगाव काटा या गावचा रहिवाशी असुन गट नं 641 मध्ये 8 एकर वडीलोपार्जीत जमीन असुन सदर जमिनीचे 1995 मध्ये वडीलांनी तोंडी वाटप करुन दिले आहे. याच गटात माझ्या भावाला देखील 8 एकर जागा वाटणीला आली आहे. परंतु जशी वाटणी झाली आहे त्याप्रमाणे भावास वारंवार विनंती करुन देखील त्याने रेकॉर्ड करण्यास तयार झाला नाही. मी माझ्या शेतजमीनीचे लेव्हल करीत असताना माझ्या भावाने मला वाटनी झाली आहे त्या प्रमाणे रेकॉर्ड केल्यानंतर लेवल कर म्हणालो आणि तुझा उस पण नंतर तोडणी कर असे म्हणाला त्या नंतर मी ठीक आहे असे म्हणालो. दिनांक 09/01/2026 रोजी सायंकाळी 05.30 वाजता माझा भाऊ रामचंद्र शिंदे त्यांच्यासोबत त्यांची दोन्ही मुले, तलाठी मॅडम, शिरसगाव काटा या माझ्या शेतातल्या घराजवळ आल्या त्यावेळी त्यांनी मला त्यांची ओळख सांगुन तुमच्या शेताचा पंचनामा करायचा आहे तुम्ही तुमच्या शेतातील माती विकत आहेत असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी कच्चे कागदावर काहितरी लिहुन घेतले व मला त्या म्हणाल्या तलाठी ऑफिस शिरसगाव काटा येथे भेटा.

त्यानंतर दि. 12/01/2026 रोजी मी तलाठी ऑफिस शिरसगाव काटा येथे जाऊन तलाठी मॅडम यांची भेट घेतली असता त्यांनी मला सांगीतले की, तुमच्या बाजुन पंचनामा करुन देते, तुम्ही मला 10,000/- रुपये दया असे म्हणुन पैसे मागीतले. माझे व तलाठी मॅडमचे आर्थीक संबंध नाहीत व कोणतेही वादविवाद नाहीत. सदर रक्कम ही कोणतीही शासकीय फि नसल्याने तलाठी मॅडम शिरसगाव काटा यांनी मागीतलेली रक्कम हि लाच रक्कम असलेचे माझी खात्री झाली त्यांनी मागीतलेली लाच रक्कम मला देण्याची ईच्छा नाही. तरी त्यांच्या विरुध्द आपले कार्यालयामार्फतीने कायदेशिर कारवाई होणेस विनंती आहे. " वगैरे मजकुराची तक्रार लिहून दिली नंतर सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रार अर्जासंबधीत असलेल्या लोकसेवकांकडे पडताळणी बाबत तक्रारदार श्री. शिंदे यांचेकडे विचारणा केली असता, तक्रारदार यांना शिरसगाव काटा, ता शिरुर जि पुणे येथे जावुन लोकसेवक तलाठी मॅडम यांना भेटणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे लोकसेविका यांचे कार्यालय तलाठी कार्यालय शिरसगाव काटा, ता शिरुर, जि. पुणे येथे पाठवुन लोकसेवीका तलाठी मॅडम यांची तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचास शासकीय व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. आणि माझेकडील एक नवीन सिलबंद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन त्याची पाहणी केली असता, त्यावर सॅनडिस्क अल्ट्रा कंपनी 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. कार्ड त्याचे एका बाजुस sandisk ultra 32 gb micro sd hc i व दुसरे बाजुस 5074 XX2125TG BM MADE IN CHINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले आणि पंचांना व तक्रारदार श्री लक्ष्मण शिंदे यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रित नसल्याची त्यांची व पंचाची खात्री करून दिली. तसेच तक्रारदार, पंच यांचे निवेदन घेतेवेळी पो शि दिवेकर/95 हे शासकीय कॅमेरा मध्ये चित्रिकरण करतील अश्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे एक नविन मायक्रो एस.डी.कार्डचे सिलबंद पॅकिंग उघडुन पंचांना दाखविले असता ते ईव्हीएम कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे मायक्रो एस.डी.कार्ड असून त्याचे पुढील बाजुस EVM Elite 32 GB Micro SD HC I मागील बाजुस EETF32GMR0825 0032F5A55 W2517044212M असे

असल्याचे दिसून आले. सदरचे मेमरीकार्ड शासकीय व्हिडीओ कॅमेरामध्ये इन्सर्ट करण्यात आले. त्यानंतर माझे सुचनेवरुन पो शि क्र 7364/ठाकुर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन प्रथम तक्रारदार, व नंतर पंचाचे सापळापुर्व पडताळणी निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 11:08 वा. होती त्याच वेळेस पो शि क्र 95 / दिवेकर यांनी निवेदनावेळेचे चित्रिकरण केले. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन माझे ताब्यात ठेवला. आणि तक्रारदार व पडताळणी/सापळा पथकास सापळापुर्व पडताळणी कारवाई अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर माझे सुचनेनुसार पोशि ठाकुर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार यांचे शर्टचे आतील बाजूस बनियनला कोणास दिसणार नाही अशा बेताने लावला. तक्रारदार श्री. शिंदे व पंच क्र. 1 श्री. खोपडे यांना तक्रारदार यांनी आणलेल्या दुचाकी वाहन क्रं एमएच 12 पिएन 6950 वरुन लोकसेविका यांची भेट घेण्याकरीता लोकसेविका तलाठी मॅडम, सजा शिरसगाव काटा, ता शिरुर येथे रवाना केले. ती वेळ 11:18 वा. होती. आम्ही उर्वरित पडताळणी कारवाई पथक शासकीय वाहनामध्ये बसुन सदर ठिकाणी थांबून राहीलो.

त्यानंतर साधारणपणे 12:33 वाजण्याचे सुमारास तक्रारदार श्री. शिंदे व पंच क्र. 1 श्री. ऋषिकेश खोपडे हे पथक थांबलेल्या ठिकाणी तक्रारदार यांचेकडील दुचाकी वाहनाने आले तेव्हा पोशि ठाकुर यांचे मार्फतीने तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून, तो बंद केला. त्यानंतर तक्रारदार यांना रवाना केलेपासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी पंचासमक्ष सांगितले कि, “मी व पंच क्र.1 असे आम्ही लोकसेविका यांची भेट घेणे करीता तलाठी कार्यालय शिरसगाव काटा, ता शिरूर जि पुणे यांचे कार्यालात गेले तेव्हा लोकसेविका तलाठी शिरसगाव तेथे हजर होते. त्यांचेसमोर कार्यालयातील काही इसम चर्चा करीत होते मी पंचाना इशारा करुन सदर महील ही तलाठी शिरसगाव काटा असल्याचे सागितले. काही वेळाने समोरील माणसे निघुन गेल्यावर तलाठी मॅडम यांनी मला बोलावले त्यावेळी मी त्यांना “त्या दिवशी पंचनामा केला होता ना” असे म्हणालो त्यावर तलाठी मॅडम मला “पाच सहा लाखांचा भुर्दड बसवील तुमच्या बोज्यावर खर सांगते डोकशावर रितसररित्या केल ना” असे म्हणाल्या. त्यावेळी मी त्यांना “आम्ही लेवल करायची नाय का मॅडम” असे म्हणालो तेंव्हा तलाठी मॅडम मला “लेवल जरी केली ना लेवलच्या पेक्षा लय उत्खनन केलेलं आहे हे पण मी सांगते” असे म्हणाल्या. आमचेमध्ये कामासंदर्भात चर्चा सुरु असताना मॅडमनी दोन्ही हाताची दहा हाताची बोटे दाखवुन दहा हजार आणंल का असा इशारा केला त्या मी त्यांना "दहा हजार ते लयं होत्यात मॅडम" असे म्हणालो असता, तलाठी मॅडम मला “थोड हे घ्या अॅडजस्ट करा” असे म्हणत त्यांनी परत मला त्यांचा दोन्ही हाताचे 10 बोटे दाखवीली. त्यावर मी त्यांना "एवढं नाय ना मॅडम" असे म्हणालो असता त्यांनी मला त्यांच्या दोन्ही हाताची आठ बोटे दाखवत आठ हजार असा इशारा केला. त्यावेळी मी त्यांना “आठ ए, आठ हजार नाय ना मॅडम एवढे” असे म्हणालो असता त्यांनी मला त्यांच्या दोन्ही हाताच्या बोटांनी सात बोटे दाखवत “हो, जा जा तुम्ही या पटकन” असे म्हणुन माझ्याकडे सात हजार रुपयांची लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच खोपडे तलाठी कार्यालयातुन बाहेर निघुन माझ्या दुचाकी वाहनावरुन पथक थांबले त्याठिकाणी परत आलो. अशी हकिकत आम्हा दोन्ही पंचांसमक्ष सांगीतली. त्यानंतर मी पंच क्रं 1 खोपडे यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत माहिती विचारली असता, त्यांनीही तक्रारदार यांनी सांगीतलेप्रमाणेच हकिकत सांगीतली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच खरे असल्याची खात्री झाली.
सदर पडताळणी करावाईवरुन लोकसेविका तलाठी शिरसगाव काटा यांनी तक्रारदार लक्ष्मण शिंदे यांना त्याचे वडीलोपार्जित जमिनीचा पंचनामा त्याचे बाजुणे करणे करीता व या पुढे मदत करणे करीता म्हणुन तडजोडी अंती 7,000/- रुपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. सदर बाबत सविस्तर पंचनाम करण्यात आला आहे.

त्यानंतर तक्रारदार यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली असता त्यांनी 500 रुपये दराच्या 14 नोटा काढुन स्वकामाई चे असुन सदर रक्कम सापळा कारवाई करीता वापरण्याचे ठरवले त्याप्रमाणे पुढील सापळापुर्व, सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्री. शिंदे व पंच क्रमांक -1 श्री. ऋषिकेश खोपडे व पंच क्रमांक - 2 कु कोमल जाधव यांचे निवेदन 13:10 वा घेण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. सदर निवेदनाचे चित्रिकरण करण्यात आले. तक्रारदार श्री. शिंदे यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले 7,000/- रु. रक्कम पंचासमक्ष हजर केली. त्यामध्ये 500/- रुपये दराच्या 14 भारतीय चलनी नोटा असे एकुण 7,000/- रु. असलेचे दिसुन आले. तक्रारदार श्री. शिंदे यांनी हजर केलेल्या भारतीय चलनातील 500/- नोटा एका को--या कागदावर लिहुन घेतले त्यावर मी व पंचानी स्वाक्षरी केली. त्यानंतर पो शि माळी यांनी शासकीय वाहनात पंच साक्षीदार आणि तक्रारदार यांना अल्ट्राव्हॉयोलेट दिवा(टॉर्च) व अँथ्रासिन पावडर दाखवून कारवाईतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले. तक्रारदार यांनी लाचेकरीता सादर केलेल्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावली. अँथ्रासिन पावडर लावलेल्या नोटा तक्रारदार श्री लक्ष्मण शिंदे यांचे पॅन्टचे समोरील बाजुच्या उजव्या खिशात ठेवल्या.

त्यानंतर लाच रक्कम स्वीकारलेनंतर ती हस्तगत करतेवेळी व लोकसेवक यांना ताब्यात घेतेवेळी त्यांचे व्हीडीओ रेकॉर्डींग करणेत येणार असल्याची माहिती पथकास देवून ती पो शि दिवेकर यांचे ताब्यात देवुन त्यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार व पंचाना व सापळा पथकास सविस्तर सुचना देवुन लोकसेवका तलाठी शिरसगाव काटा यांनी लाच स्विकारल्या नंतर कार्यायलयाचे बाहेर आवारात येवुन लाच स्वीकारलेबाबतचा इशारा करणे बाबत तक्रारदार यांना सुचना दिली. सापळा पथकातील टीम मधिल सर्वांना काम समजावुन सुचना देण्यात आल्या. सापळा कारवाईच्या अनुशंगाने सुचना देत असतानाच तक्रारदार शिंदे यांनी पंचांसमक्ष मला सांगितले की लोकसेविका तलाठी मॅडम शिरसगाव काटा यांचा त्यानां मो.क्रं.9604449988 यावरुन फोन येत असलेबाबत सांगीतले. त्यावेळी सुचना प्रमाणे तक्रारदार यांनी तलाठी मॅडमचा फोन रिसीव्ह करुन त्यांचे मोबाईलचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी तलाठी मॅडम यांनी तक्रारदार यांना कधी येत आहे अशी विचारणा केली तेव्हा लगेच येत असलेबाबत तक्रारदार यांनी सांगितले. सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डवर रेकॉडे करण्यात आला आहे.त्यांनतर व्हाईस रेकॉर्डर मशिन सुरू करून ते ऐका सेफटी पिनच्या साहयाने तक्रारदार यांचे बनीयानचे आतुन लावुन दिला. तक्रारदार व पंच क्रमांक 01 श्री ऋषिकेश खोपडे यांना लोकसेवका तलाठी शिरसगाव काटा यांना भेटण्यासाठी तलाठी कार्यालय शिरसगाव काटा, ता शिरुर, जि पुणे येथे जाण्याकरीता तक्रारदार व पंच श्री शिंदे असे तक्रारदार यांचे कडील मोटार सायकल वरुन रवाना केले. त्याचे मागुन मी व सापळा पथक , पंच क्रमांक दोन यांचे सह सरकारी वाहनाने तसेच भुषण ठाकुर पो.अंम. 7364 हे तक्रारदार यांचे मुलाची दुचाकी वाहन क्रं एमएच 12 आर जे 3442 यावरुन सापळा कारवाई करीता शासकीय वाहना मागोमाग तलाठी कार्यालय, शिरसगाव काटा कार्यालयाच्या दिशेने 13.26 वा रवाना झालो.

शिरसगाव काटा तलाठी कार्यालयाच्या परिसरामध्ये पोहोचुन कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबलो असता तक्रारदार यांनी तलाठी कार्यालयाच्या बाहेर त्यांचे दुचाकी वाहन पार्क करुन तक्रारदार व पंच क्रं 1 हे तलाठी कार्यालयात गेले. काहिवेळात तलाठी कार्यालयातुन तक्रारदार, पंच 1 व त्यांचेसोबत एक महिला काळया रंगाची बॅग घेवुन बाहेर आली व तक्रारदार यांनी लाच स्वीकारले बाबत कोणताही इशारा न करता नमुद महिला या तक्रारदाराच्या वाहनावर बसुन न्हावराच्या दिशेने निघाल्या त्यावेळी पो.अंम. ठाकुर व पंच क्रं 1 हे त्यांचेकडील दुचाकी वाहनावरुन तक्रारदार यांचे मागोमाग निघाले. व सापळा पथक देखिल काही अंतर ठेवुन त्यांचे मागे निघाले.

तक्रारदार यांनी त्यांचे वाहन शिरुर रोडवरील छत्रपती संभाजी महाराज चौकाकडुन तळेगाव कडे जाणा-या रोडवर थांबवीले. त्यावेळी पोशि ठाकुर व पंच क्र 01 तक्रारदार व तलाठी शिरसगावा काटा यांचेजवळ काही अंतरावर जावुन थांबले. त्यानंतर संपुर्ण पथक व पंच क्रं 2 शासकीय वाहनामधुन उतरुन सदर ठिकाणी सापळा लावुन थांबले. त्यावेळी तक्रारदार व नमुद महिलेमध्ये चर्चा सुरु असताना तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा केला. त्याचवेळी पो.अंम. ठाकुर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. ती वेळ 14.06 वा ची होती. दिलेल्या सुचना नुसार पो शि दिवेकर यांनी व्ही डी ओ रेकॉर्डीग सुरु केले. तेव्हा मपोह काळे यांनी महीला लोकसेक तलाठी शिरसगाव काटा यांना ताब्यात घेते वेळेस आरोपी लोकसेवीका तलाठी शिरसगाव काटा यांनी त्यांचे कडील असणारी चॉकलेटी रंगाची पर्स शेजारी उभे असणा—या टाटा कंपनीच्या ट्रकचा क्रमांक एमएच 13 एएक्स 3738 मध्ये टाकली. सदरची बॅग पंच क्रमांक 1 यांनी माझे सुचने नुसार काढली. आरोपी लोकसेवीका तलाठी शिरसगाव काटा या खुप घाबरलेल्या दिसुन आल्या आम्ही त्यांना आमची ओळख सांगुन त्यांचा नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्रीमती. प्रमीला नागेश वानखेडे, वय – 44 वर्षे, पद - ग्राम महसुल अधिकारी, सजा – शिरसगाव काटा, ता. शिरुर, जि. पुणे रा. फलॅट नं 404, तक्षशिला सोसायटी बिल्डींग ए, अशोका नगर, पठारे ठुबे नगर, खराडी बायपास, पुणे असे सांगितले. त्यांनतर पंच क्रमांक 1 व तक्रादार यानी सांगितले कि लोकसेविका यांनी लाच रक्कम त्यांचे कडील काळया रंगाच्या बॅगेत ठेवली आहे. त्यानंतर आरोपी लोकसेविका यांना शासकीय वाहनात बसवण्यात आले. लाचेची रक्कम लोकसेवकाने काळया रंगाचे त्यांचे बॅग मधुनकाढून हजर केलेने पंच क्रमांक 2 श्री जाधव यांनी ताब्यात घेवुन ती लिहून ठेवलेल्या नोटांचे नबरशी पडताळणी केली असता त्याच नोटा असलेचे दिसुन आले. त्यांनतर सदर ठिकाणी कृत्रिम अंधार करून अॅल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात प्रथम लोकसेविका यांचे उजव्या हातावर निळसर रंगाची चकाकी दिसुन आली तसेच पंच क्रमांक 2 यांनी ताब्यात घेतलेल्या 500रू दराच्या नोटावर व पंच क्रमांक 2 यांचे हातावर निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. वरिल सर्व घटनेचे पोशि दिवेकर यांनी शासकीय व्हिडीओ कॅमेरामध्ये व्हीडीओ चित्रिकरण केले आहे. सदर कारवाई बाबत आम्ही शिरुर चे तहसिलदार श्री बाळासाहेब म्हस्के यांना फोनव्दारे माहीती दिली. लोकसेवक यांना सापळा करवाईचा उददेश समाजवून सांगुन सापळा पथकासह पुढील कार्यावाही करता शिरुर पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले.

आम्ही तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी व पंच क्र 1 श्री खोपडे लोकसेविका यांचे कार्यालयात गेलो असता तेथे लोकसेविका श्रीमती प्रमीला नागेश वानखेडे या कार्यालयात हजर होत्या त्याची भेट घेतली असता. त्यावेळी आमचेमध्ये चर्चा सुरु असतानाच . त्यावेळी त्यांनी माझ्याकडे पंचांबाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना पाहुणे आहेत असे म्हणालो. त्यानंतर वानखेडे मॅडम मला न्हावरे येथे सोडवण्यास येणे बाबात सांगितले. त्यांनी सांगितले प्रमाणे मी त्यांना न्हावरे येथील छत्रपती संभाजी महाराज चौकाकडुन तळेगावकडे जाणा-या रोडवर जावुन लोकसेविकेने सांगीतलेप्रमाणे थांबलो. त्यावेळी लोकसेविका वानखेडे या माझ्या दुचाकीवरुन खाली उतरल्या व माझ्यासोबत माझ्या कामासंदर्भात चर्चा केली.त्या नंतर लोकसेविका वानखेडे मॅडम यांनी मला हाताने पैशांचा इशारा करत "किती ए" अशी विचारणा केली. त्यावर मी त्यांना "सात आणलेत, तुम्ही म्हणले तेवढे, सात हजार" असे म्हणालो. त्यावर लोकसेविका वानखेडे मला "हं.." असे म्हणत त्यांनी त्यांचेकडील काळ्या रंगाची खांदयावरील बॅग माझ्यासमोर धरली व बॅगची चैन उघडत लाच रक्कम बॅगेमध्ये ठेवण्याचा इशारा केला. त्यावर मी माझ्या पॅंटच्या उजव्या बाजुच्या समोरील खिशामधुन माझ्या उजव्या हाताने लाच रक्कम काढुन लोकसेविका वानखेडे मॅडम यांनी सांगीतलेप्रमाणे त्यांचे बॅगमध्ये ठेवत असताना मी त्यांना "सात हजार येत मॅडम मोजुन बघा" असे म्हणालो. त्यावेळी लोकसेविका वानखेडे यांनी मला "उत्खनन सुरू ए का" अशी विचारणा केली त्यावर मी त्यांना "नाही तीन महिने झाले लेवल बंद केलेली ए" असे म्हणत असताना मी पथकास लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्या नंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेते वेळी तलाठी मॅडम शिरसगाव काटा यांनी त्यांना संशय आल्याने त्यांनी त्यांचे कडील असलेली चॉकलटी रंगाची पर्स ही शेजारीच उभे असलेल्या टाटा कंपनीच्या ट्रकचा क्रमांक एमएच 13 एएक्स 3738 मध्ये टाकली. ती पर्स पो नि घरबुडे यांचे सुचनेनुसार पंच क्र 1 यांनी काढुन ताब्यात घेतली. अशी हकिकत दोन्ही पंचांसमक्ष सांगीतली. त्यानंतर पंच क्र. 1 श्री. खोपडे यांना घडलेला घटनाक्रम विचारला असता, त्यांनी तक्रारदार यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी लोकसेविका श्रीमती. प्रमीला नागेश वानखेडे, वय – 44 वर्षे, पद - ग्राम महसुल अधिकारी, सजा – शिरसगाव काटा, ता. शिरुर, जि. पुणे रा. फलॅट नं 404, तक्षशिला सोसायटी बिल्डींग ए, अशोका नगर, पठारे ठुबे नगर, खराडी बायपास, पुणे यांनी तक्रारदार यांचे जमिनीचा पंचनामा त्यांचे बाजुने करुन देणे करीता तसेच इथुन पुढे मदत करणे करीता म्हणुन 10,000/रू लाच रकमेची मागणी करून दिनांक 16/01/2026 रोजीचे पडताळणी दरम्यान पंचासमक्ष तडजोडीअंती 7,000/रू लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याचे कबूल केले व दिनांक 16/01/2026 रोजी लोकसेविका श्रीमती. प्रमीला नागेश वानखेडे, वय – 44 वर्षे, पद - ग्राम महसुल अधिकारी, सजा – शिरसगाव काटा, ता. शिरुर, जि. पुणे यांनी छत्रपती संभाजी चौक, न्हावरे - तळेगावरोड, न्हावरा , ता शिरुर, जि पुणे येथे पंचासमक्ष 7,000/रूपये लाच रक्कम स्वीकारली म्हणुन लोकसेविका श्रीमती. प्रमीला नागेश वानखेडे, वय – 44 वर्षे, पद - ग्राम महसुल अधिकारी, सजा – शिरसगाव काटा, ता. शिरुर, जि. पुणे यांनी सरकारी पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार यांचे वडीलोपार्जित जमिनीचा पंचनामा हा तक्रारदार यांचे बाजुने करुन देणे करीता तसेच येथुन पुढे मदत करणे करीता म्हणुन 7,000/रू लाच रक्कम स्वीकारली आहे म्हणून माझी श्रीमती. प्रमीला नागेश वानखेडे, वय – 44 वर्षे, पद - ग्राम महसुल अधिकारी, सजा – शिरसगाव काटा, ता. शिरुर, जि. पुणे याचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे.
तपासी अधिकारी -श्रीमती भारती मोरे पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे
दाखल अंमलदार -पोहवा भगत/98

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANDESH ARUN KENJALE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
शिरूर पोलीस स्टेशन पुणे ग्रा.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANDESH ARUN KEN

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**